

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन..

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक १४ वा ● शुक्रवार ३१ मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 14 | Date : 31/05/2024 blow Friday Page 4 Price 4


## जितेंद्र आव्हाड यांच्या निषेधार्थ रिपब्लिकन पक्षाचे राज्यभर आंदोलन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

### मुंबईत चैत्यभुमी येथे रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी जितेंद्र आव्हाडचा फोटो जाळून केले निषेध आंदोलनः सिध्दार्थ कासारे



**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो फाडण्याची अक्षम्य घोडचुक करणाऱ्या स्टंटबाज जितेद्र आव्हाड यांचा रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आज मुंबईत चैत्यभुमी येथे जितेंद्र आव्हाड यांचा फोटो जाळुन तिव्र निषेध करण्यात आला. जितेंद्र आव्हाड यांचे कृत्य माफ करण्यासारखे नसुन त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे ; यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाच्या वतीने तिव्र निषेध आंदोलन करण्यात येणार आहे अशी माहिती रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आज दिली.

मुंबई चैत्यभुमी येथे आज दुपारी १२ वाजता रिपब्लिकन पक्षाच्या मुंबई प्रदेश च्या वतीने स्टंटबाज जितेद्र आव्हाड यांच्या निषेधार्थ तिव्र निषेध आंदोलन । पान २ वर

### अखेरच्या टप्प्यातील प्रचार संपुष्टात

# सात राज्यांमधील ५७ मतदारसंघांमध्ये उद्या मतदान

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यातील प्रचार गुरुवारी सायंकाळी संपुष्टात आला. या टप्प्यात सात राज्ये व एका केंद्रशासित प्रदेशातील ५७ मतदारसंघांमध्ये उद्या, शनिवारी मतदान होणार आहे. निवडणुकीच्या या अंतिम टप्प्यात ९०४ उमेदवार रिंगणात आहेत.पंजाबमधील सर्व १३ आणि हिमाचल प्रदेशातील सर्व चार जागांसाठी मतदान होणार आहे. चंडिगड या एका केंद्रशासित प्रदेशातही मतदान होणार आहे. त्याशिवाय ओडिशा विधानसभेच्या ४२ जागांसाठीही मतदान होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाराणसी मतदारसंघातही याच टप्प्यात मतदान होणार आहे. पंजाबमधील भंटिडा मतदारसंघातील शिरोमणी अकाली दलाच्या हरसिमरत कौर, हिमाचल प्रदेशातील मंडीतील भाजप उमेदवार अभिनेत्री कंगना राणावत, काँग्रेसचे विक्रमादित्य सिंह हे महत्त्वाचे उमेदवार आहेत.

**कुठे मतदान?**
उत्तर प्रदेश : १३
पंजाब : १३
पश्रिचम बंगाल : ९
बिहार : ८
ओडिशा : ६
हिमाचल प्रदेश : ४
झारखंड : ३
चंडिगड : १



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी वाराणसीच्या मतदारांना १ जून रोजी मतदान करताना नवीन विक्रम प्रस्थापित करण्याचे आवाहन केले. काशीची निवडणूक केवळ नवकाशी नव्हे, तर विकसित भारताच्या निर्मितीचे प्रतीक आहे, असे पंतप्रधान म्हणाले. मतदानापूर्वी मोदींनी वाराणसीतील मतदारांसाठी एक व्हिडिओ संदेश प्रसारित केला. ''माझ्यासाठी काशी ही भक्ती, शक्ती आणि अलिप्ततेची नगरी आहे. काशी ही जगाची सांस्कृतिक राजधानी, संगीताची भूमी आहे. या शहराचे प्रतिनिधी बनणे हे बाबा विश्र्वनाथांच्या अपार कृपेने आणि तुमच्या आशीर्वादानेच शक्य आहे,'' असे पंतप्रधान म्हणाले. काशीच्या जनतेचे प्रत्येक मत माझ्या ताकदीत भर घालेल आणि मला नवी ऊर्जा देईल, असे त्यांनी सांगितले.

## पंढरपूर-शेटफळ रस्त्यावर अपघातात चौघांचा मृत्यू; अन्य चौघे जखमी

**सोलापूर/प्रतिनिधी**

ओमिनी आणि स्कोडा मोटारीची समोरासमोर धडक बसून घडलेल्या अपघातात चौघाजणांचा मृत्यू झाला. तर अन्य चौघे जखमी झाले. मोहोळ तालुक्यातील आष्टी गावच्या शिवारात सायंकाळी सहाच्या सुमारास हा अपघात झाला.

विशाल राजाराम माने (वय ३५), सिध्दार्थ सूर्यवंशी (वय ६ महिने, जगूबाई धनाजी सूर्यवंशी (वय ५५) आणि सुब्राव पांडुरंग बाबर (वय ३५) अशी मृतांची नावे आहेत. प्रतीक्षा पांडुरंग बाबर, अस्मिता विशाल माने, ऋतुजा विशाल माने आणि सृष्टी आण्णा सूर्यवंशी या चारजणी जखमी झाल्या.

हे सर्वजण सातारा जिल्ह्यातील खटाव व मायनी भागातील राहणारे आहेत. यासंदर्भात मोहोळ पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार ओमिनी मोटारीतून (एमएच १२ एचएफ ३४९६) जखमी व मृत पंढरपूरकडे देवदर्शनासाठी निघाले होते.

तर स्कोडा मोटार (एमएच ०१ बीके ८५८२) ही पंढरपूरहून मोहोळ तालुक्यातील शेटफळच्या दिशेने दिशेने निघाली होती. आष्टी शिवारात दोन्ही मोटारी एकमेकांना समोरासमोर धडकली. पुढील तपास मोहोळ पोलीस करीत आहेत.

## पालखी तळ व मार्गावर भाविकांना आवश्यक सर्व सोयी सुविधा देण्यास प्राधान्य द्यावे : जिल्हाधिकारी

### पालखी तळांची व मार्गाची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी



**पंढरपूर/प्रतिनिधी:**

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा १७ जुलै २०२४ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्र्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ११ जुलै तर जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे १२ जुलै २०२४ रोजी सोलापूर जिल्ह्यात आगमन होणार आहे. या पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. या सर्व वारकरी भाविकांना पालखी मार्ग, विसावा तसेच पालखी तळांवर आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यास सर्व संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी प्राधान्य द्यावे. तसेच प्रशासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून दिलेले जबाबदारी चोखपणे पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

आषाढी यात्रेच्या पार्श्र्वभूमीवर पालखी तळांवर, मार्गावर वारकरी व भाविकांना कोणतही अडचण निर्माण होऊ नये तसेच भाविकांना पालखीतळावर प्रशासनाच्यावतीने अधिकच्या आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज पालखी तळांची आणि पालखी मार्गाची पाहणी केली.

यावेळी त्यांच्या समवेत जिल्हा पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर जिल्हाधिकारी । पान २ वर

## अभ्यासक्रमात मनुस्मृती आणण्याच्या भाजपच्या प्रयत्नाला विरोध : नाना पटोले

**कराड/दैनिक यशसिध्दि न्यूज**



आमदार जितेंद्र आव्हाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र फाडल्याच्या कृत्याचे कोणीही समर्थन करणार नाही. परंतु, मनुस्मृती अभ्यासात यावी, या भाजपच्या प्रयत्नाला काँग्रेसचा नेहमीच विरोध असेल, मनुस्मृती हा कालबाह्य ग्रंथ असून अभ्यासक्रमामध्ये तो आणून संविधान संपवण्याचा भाजपचा डाव असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

कोल्हापूरहून भुईंज (ता. वाई) दौऱ्यावर जाताना नाना पटोले यांनी कराडमध्ये माध्यमांशी संवाद साधला. तसेच प्रचारातील महाविकास आघाडीच्या 'संविधान बचाव'च्या मुद्यावर ते म्हणाले, लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने 'संविधान बचाव' म्हणून प्रचार केला. परंतु, महाविकास आघाडीतील एक घटक पक्ष असलेल्या आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केलेले कृत्य संविधान विरोधी असून, याचे उत्तर जितेंद्र आव्हाडच देतील, अशी सावध भूमिका पटोले यांनी घेतली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ध्यानाची काँग्रेसला धास्ती लागल्याच्या भाजपच्या टीकेबाबत पटोले म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी ध्यानस्थ बसत असले, तरी काँग्रसने त्यांच्या ध्यानाची धास्ती घेतलेली नाही. भाजपने पेरलली ती अफवा आहे. खरंतर पंतप्रधान म्हणून मोदींचे हे शेवटचेच ध्यान आहे. फक्त सध्या आचारसंहिता असल्याने त्यांचे ध्यान माध्यमांच्या माध्यमातून जगासमोर येवू नये, अशी आमची अपेक्षा असून त्यांना पुढील काळात ध्यानच । पान २ वर

### अक्कलकोट येथे जितेंद्र आव्हाडांच्या पुतळ्यास जोडोमार आंदोलन

## आव्हाड यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करा निजपा गायकवाड यांची मागणी

**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची विटंबना केल्याच्या निषेधार्थ अक्कलकोट येथे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या प्रतिमेस जोडोमार आंदोलन करण्यात आले. भाजपा अनु जाती विभाग तालुकाध्यक्ष नीजपा गायकवाड यांनी जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी बुधवार महाडमध्ये मनुस्मृती दहन केले. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात मनुस्मृतीतील श्र्लोक घेण्यात येणार असल्याच्या निषेधार्थ त्यांनी ही भूमिका घेतली होती. मात्र मनुस्मृती दहन करत असतानाच आव्हाड यांच्याकडून डॉ. आंबेडकरांचे छायाचित्र असलेले एक पोस्टर फाडले. हा मुद्दा धरत भाजपने त्यांच्या विरोधात राज्यभर आंदोलन केले त्याचाच एक भाग म्हणून अक्कलकोट मध्येही आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी व नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, भाजपा अनु जाती विभाग तालुकाध्यक्ष निजप्पा गायकवाड, भाजपा अल्प संख्याक जिल्हाध्यक्ष नन्नु कोरबु , शहर अध्यक्ष शिवशरण जोजन, विनोद मोरे, धोंडूराज बनसोडे, यशवंत घोगडे, अतिश पवार, गुरू माळी, नागेश कलशेट्टी, अंकुश चौगुले, व भाजपा पदाधिकारी आणि उपस्थित होते.

## अक्कलकोट बस स्टॉप समोर अवैध प्रवासी वाहतूकदाराकडून स्वामी भक्ताचे लूटमार सुरू याकडे पोलीस लक्ष देतील का ?

**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ दररोज लाखो स्वामीभक्त अक्कलकोट येथे येत असतात अक्कलकोट बस स्टॉप समोर गर्दी होत असतो यामध्ये पुणे मुंबई व इतर ठिकाणाहून आलेले स्वामी भक्तांकडून अक्कलकोट रंगभवन सोलापूर या ठिकाणी घेऊन जाण्यासाठी शंभर ते दीडशे रुपये एका प्रवाशांकडून लुटमार करण्यात येते आहेत

काल संध्याकाळी अक्कलकोट रांगभवनकडे जाणाऱ्या गाडी क्रमांक चक २५ - २७२ या वाहन चालक कडून प्रत्येकी १०० रुपये लूट चालू होते याबाबत त्याला विचारले असता उर्मट बोलून



प्रवाशांना वाद घालत होता असे प्रकार वाढत असून त्यामुळे अक्कलकोटचे नाव राज्यात खराब होत आहे बस स्थानक परिसरात संध्याकाळी होत असलेल्या मोठ्या प्रमाणातील अवैध प्रवासी वाहतूक गाड्यावर पोलीस कार्यवाही करतील का असे प्रश्र्न स्वामीभक्त विचारत आहेत.

मी सकाळी स्वामी दर्शनासाठी मुंबईहुन आले असून बस मध्ये जास्त गर्दी असल्यामुळे रेल्वे स्थानक पासून जीपने अक्कलकोट आले असता मला दीडशे रुपये घेतले व संध्याकाळी जात असताना शंभर रुपये घेतले आहेत हे एक प्रकारे स्वामी भक्ताचे लूटमार आहे याकडे पोलीस प्रशासन लक्ष देऊन कडक कार्यवाही करण्यात यावी-**संजय पाठक,स्वामी भक्त मुंबई**

अक्कलकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी याबाबत तत्काळ लक्ष घालून याठिकाणी होत असलेले बेकायदेशीर अवैध प्रवाशी वाहतूक बंद करण्याची मागणी जनतेतून होत आहे.

# संपादकीय

## कोरडी आश्वासने ..

सध्या बहुतांश भागात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. अशातच अनेक ठिकाणी पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले. मागील वर्षी पावसाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे धरणं, तलावांमध्ये पाण्याचा साठा अल्पप्रमाणात राहिला आहे. तसेच उष्णतेत वाढ झाल्यामुळे विहिरी आणि बोअरवेलची पाणी पातळीदेखील खालावली आहे. काही ठिकाणी विहिरी आटल्या आहेत, तर बोअरवेल बंद पडले आहेत. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कोकणातील बहुतांश भाग आता पाणीटंचाईचा सामना करत आहे. संभाजीनगरात यामुळे बांधकामांना बंदी घालण्यात आली आहे. अन्य भागातही पाणी वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये केवळ २४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. दहा हजारांहून अधिक वाड्या-वस्त्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. सरकार टँकरने पुरवठा करत आहे आणि तो करायलाच हवा, पण त्याचवेळी यामागे टँकर लॉबी आहे की काय याचाही विचार व्हावा. टँकरद्वारे दरवर्षी पाणी पुरवण्यापेक्षा पाण्याचे योग्य नियोजन आणि साठा केल्यास ही गरजच पडणार नाही. दुष्काळी गावांमध्ये जमीन महसुलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेती निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, शेतीपंपाच्या बिलामध्ये सवलत, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोजगार हमी योजनेंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर, शेतीपंपाची वीजजोडणी खंडित न करणे असे उपाय राबविले जाणे अपेक्षित आहे, पण निवडणुकीच्या धामधुमीत या प्रक्रियेला वेग आला नाही. दुष्काळापेक्षा निवडणुकांची गणिते महत्त्वाची वाटत असल्याने याबद्दल नाराजी असल्याचे स्पष्टपणे दिसते. दुसरीकडे पाणीटंचाईमुळे जनावरांच्या चाऱ्याचे दरदेखील वाढताना दिसत आहेत. कडबा, हिरवा चारा, सरकी पेंडीचे भावही वाढले आहेत. त्यामुळे जनावरे जगवायची कशी, असा प्रश्न पशुपालकांना पडला आहे. शेतकऱ्यांच्या नावाने दुष्काळाचे फक्त राजकारण केले जाते. दुष्काळ हा राजकीय नेत्यांचा पर्यटन दौरा झाला आहे. राजकारण्यांच्या चिखलफेकीमुळे शेतकऱ्यांच्या समस्या दूर होत नाहीत, त्यांना मदत करण्याची जबाबदारी सरकारची आहे. ही जबाबदारी युती सरकारने झटकली आहे. शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी भाजपच्या काही नेत्यांनी निवडणूक काळात कोरडी आश्वासने दिली आहेत

पान १ वरुन

## जितेंद्र आव्हाड यांच्या निषेधार्थ ..

करण्यात आले. रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे यांच्या नेतृत्वात जितेद्र आव्हाड यांचे फोटो जाळण्याचे निषेध आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात रिपाइं चे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश माहातेकर,राज्य सरचिटणीस गौतम सोनावणे, मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे,महिला आघाडी मुंबई अध्यक्ष उषाताई रामळू,जिल्हा अध्यक्ष संजय डोळसे, रमेश गायकवाड; संजय पवार,साधु कटके,हरिहर यादव ;सोना कांबळे,रवि गायकवाड आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

## पालखी तळ व मार्गावर भाविकांना

मोनिकासिंग ठाकूर, प्रांताधिकारी सचिन इथापे, माळशिरसच्या प्रांताधिकारी विजया पांगारकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, सुरेश शेजुळ, गटविकास अधिकारी सुशील संसारे, सा.बां.कार्यकारी अभियंता अमित निंबकर, सुनिता पाटील, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले,नायब तहसिलदार मनोज श्रोत्री यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, पालखी मार्गावरुन पालखी तळांकडे जाणाऱ्या रस्त्यांची वारीपूर्वी दुरूस्ती करावी. पालखी तळावर आवश्यक ठिकाणी मुरूमीकरण, स्वच्छता, मुबलक पाणी पुरवठा ,आरोग्य सुविधाबाबत नियोजन करावे. त्याचबरोबर आवश्यक ठिकाणच्या पालखी विसावा व तळाच्या कट्ट्यांची दुरुस्ती करावी. ज्या पालखी तळांवर सोहळ्यासाठी जागा अपुरी पडत असेल त्याठिकाणी आवश्यक जागेची उपलब्धता करण्याबाबत कार्यवाही करावी. पालखी मार्गावर व तळांवर उपलब्ध सोयी सुविधांचे सूचना फलक लावावेत. महावितरणने वाखरी पालखी तळावरील मधोमध असणाऱ्या विद्युत वाहक तारा व खांब एका बाजूला सुरक्षित स्थळी लावण्यात यावेत अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक देशपांडे म्हणाले, पालखी सोहळा कालावधीत भाविकांना पायी चालताना कोणत्याही अडचणी येऊ नये तसेच वाहतूक व्यवस्था सुरळीत रहावी त्याचबरोबर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण होऊ नये या दृष्टीने पोलिस प्रशासनाचे काटेकोरपणे नियोजन करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी कुमार अशीर्वाद यांनी माळशिरस तालुक्यातील धर्मपुरी, नातेपुते, पुरंदावडे, माळशिरस, खडूस, वेळापूर, तोंडले, अकलूज ,माळीनगर, बोरगाव, माळखांबी, तसेच पंढरपूर तालुक्यातील पिराची कुरोली, भंडीशेगाव, वाखरी या ठिकाणच्या पालखी तळांची , विसावाच्या ठिकाणची तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणची पाहणी करुन संबधितांना आवशयक त्या सूचना दिल्या.

# बड्डे आहे भावाचा जल्लोष साऱ्यां गावाचा..

## वाढदिवसानिमित्त जल्लोषात रोडवर तलवारीने कापला केक

## २०वर्षीय तरूणांवर बिबी पोलिस स्टेशनची कारवाई



**बुलढाणा/राहुल साबळे**

२८/०५/२०२४ रोजी बिबी पोलीस स्टेशन हद्दीतील खापरखेड घुले ता. लोणार जी.बुलढाणा या गावातील वैभव प्रल्हाद घुले वय-२० वर्षे याचा वाढदिवस असल्याने त्याने आपल्या मित्रांना आमंत्रित करून गावात रोडवर मोटरसायकल वर बॉस नाव लिहिलेले चार केक तलवारीच्या साहाय्याने कापुन हातात तलवार घेऊन दहशत निर्माण केली.व धड्याक्यात वाढदिवस साजरा केला. मात्र त्याचे हेच कृत्य बीबी पोलिसांना समजताच दि.२९/०५/२४ रोजी बीबी पोलीसांनी वैभव घुले यास ताब्यात घेऊन विचारपूस करत त्याच्याकडून ०१ तलवार जप्त केली.व त्याला पोलीस स्टेशनमध्ये आणून त्याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियम व महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.सदरची कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पो.स्टे बीबी चे ठाणेदार स.पो.नि संदिप पाटील,पोलीस अंमलदार अरुण सानप, यशवंत जैवाळ यांनी केली.

# शासकीय सफाई कामगारांच्या निवासी शाळेचा १००% निकाल

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभाग अंतर्गत भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संचलित शासकीय सफाई कामगारांच्या मुला मुलांची निवासी शाळा येरवडा पुणे -६ येथे कार्यरत असून सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षांमध्ये इयत्ता १० या वर्गात एकुण २२ विद्यार्थी शिक्षण घेत होते नुकतेच जाहीर झालेल्या एस एस सी बोर्ड निकालामध्ये शाळेचा १००% निकाल यावर्षी लागलेला असून २०१८ ते २०२३-२४ अशी सलग ६ वर्ष १००%निकालाची परंपरा शाळेने कायम राखले असुन एकुण २२ विद्यार्थ्यांमध्ये सर्वप्रथम कु. महादेवी विठ्ठल तवर- ८५ % द्वितीय कु. श्रेया दुर्योधन यमगर- ८४.८० % तृतीय कुमार रांजने सुमित लक्ष्मण - ८३.८० % या क्रमांकाने विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेले असून २२ विद्यार्थ्यांपैकी ११ विद्यार्थी हे विशेष प्राविण्य व ११ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत .

**शासकीय सफाई कामगारांच्या मुला मुलांची निवासी** शाळेतील विद्यार्थ्यांना बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे, निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या कला व गुणांना वाव मिळून देण्यासाठी विद्यार्थ्यांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. मा महासंचालक, सुनिल वारे, मा निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्रीमती शुभांगी पाटील, मुख्याध्यापिका श्रीमती जयश्री चेडके व सर्व शिक्षक यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभलेले आहे. बार्टी संस्थेच्या वतीने सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या

# हनुमान नगर सारख्या झोपडपट्टीतील तृतीपंथी प्रिती ने मिळविले बारावी च्या परिक्षेत घवघवीत यश

**सोलापूर/महेश गायकवाड**

हनुमान नगर सारख्या झोपडपट्टीतील तृतीपंथी प्रिती नागटिळक याने इयता बारावी च्या परिक्षेत मोठे घवघवीत यश मिळविले आहे त्याच्या या यशा बद्धधल सर्वत्र कौतुक केले जात असुन प्रिती च्या लहान पणापासून च्या जीवनाची स्टोरी सोलापूर जिल्हा परीषदेचे कार्यकारी अभियंता आणि सामजिक जाणीव असणारे अधिकारी राजेश जगताप यांनी सोशल मीडियाचा माध्यमातुन रेखाटले आहेत.



सिग्नल वर पैसे मागणारा हा तृतीयपंथी आज शैक्षणिक क्षेत्राकडे मोठ्या संख्येने वळत असून समाजाने याला स्वीकारले पाहिजे त्याचबरोबर तृतीयपंथांना समाजामध्ये ताठ मानेने जगण्याचा अधिकार त्यांना ही आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचा अधिकार संविधानाच्या माध्यमातुन सर्वांना दिलेला आहे.त्यामुळे तृतीपंथी यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन समाजाने बदलण्याची सद्या नितांत गरज आहे. समाजामध्ये तृतीपंथी यांना स्थान निर्माण करण्याची व त्या संधीची सद्या गरज आहे

**राजेश जगताप कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद, सोलापूर**

शिक्षण हे कुणीही आणि केव्हा ही घेऊ शकते याला वयाची अट नाही किंवा कसले बंधन नाही त्यामुळेच सोलापूर मधील हनुमान नगर या झोपडपट्टी भागामधील रहिवाशी असलेला तृतीपंथी रविंद्र उर्फ प्रीति नागटिळक याने इयत्ता बारावी परीक्षेत मोठे यश मिळविले आहे.बारावी परीक्षेत तृतीयपंथीला यश जीवनात वावरत असताना सर्वांना समान अधिकार आहे असे नेहमी म्हटले जाते, परंतु काही वेळा पुरुष स्त्री, उच्च नीच, गरीब श्रीमंत, धर्मभेद, जात-भेद यावरून वाद झालेले अनेक विषय नेहमी समोर आले आहेत. या सर्वांच्या पलीकडे आहे आहे तो एक वेगळा प्रश्र्न ज्याकडे सर्व मानव जातीने प्रेमाने, आपुलकीने पाहिले पाहिजे. ते म्हणजे तृतीयपंथीय, नैसर्गिक दृष्ट्या त्यांच्यावर ओढवलेली आपत्ती पाहता त्यांना सहानुभूतीने पाहत, त्यांना समाजात उंच मानेने जगण्यासाठी मदत व्हावी अशीच अपेक्षा तृतीयपंथीयांची असते. अशा सर्व परिस्थितीतून यशाचे शिखर गाठत काहीतरी करून दाखवण्याची मानसिकता उराशी बाळगत आज एका तृतीयपंथीयांनी यश गाठले, मग त्याचे कौतुक तर नक्की झाले पाहिजे.

सोलापूर शहरातील हनुमान नगर येथे राहणाऱ्या रवींद्र उर्फ प्रीती नागटिळक सिग्नल वर पैसे कमावणारे तृतीयपंथी मधील एक. बारावी मध्ये एक्कोन पन्नास टक्क्यांनी उत्तीर्ण होत पोलीस भरती होण्याचे स्वप्न उघड्या डोळ्यांनी पाहत त्याकडे वाटचाल सुरू केली आहे. आयुष्यात खडतर प्रवास करत दहा वर्षापूर्वी सुटलेला अभ्यास पुन्हा उरी बाळगून कुटुंब व मित्रांच्या पाठिंबामुळे पुन्हा पोलीस भरतीचे स्वप्न पाहणे शक्य झाले आहे. अक्कलकोट तालुक्यातील कडबगाव (अक्कलकोट स्टेशन) येथील सिध्दाराम म्हैत्रे ज्युनियर कॉलेज मधे अक्कलकोटचे प्रा.सुर्यकांत कडबगांवकर व कोन्हळीचे शिक्षक मल्लय्या हिरेमठ यांच्या सहकार्याने प्रवेश मिळवला. प्राचार्य कंचनाळ सर व कडबगांवकर सर यांचा मार्गदर्शन मिळाला .सिग्नल वर पैसे मागणे तर रात्रीच्या वेळी अभ्यास करुन बारावी परीक्षा उत्तीर्ण झाले. सद्यःस्थितीला स्वकष्टावर पोलीस भरतीचा सराव करत असून समाजाच्या पाठिंब्याने पोलीस प्रशिक्षण केंद्र मार्फत सराव करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## अभ्यासक्रमात मनुस्मृती..

करत बसायचे आहे, अशी टीकाही पटोले यांनी केली.

राज्यात काँग्रेसला किती जागा मिळतील? या प्रश्र्नावर ते म्हणाले, काँग्रेसने राज्यात एकूण १७ जागांवर निवडणूक लढवली आहे. यातील १६ जागांवर काँग्रेसला निश्र्चित मोठे यश मिळेल. परंतु, एका जागेबाबत घासून निकाल होईल. जर नशिबाने साथ दिल्यास यातही काँग्रेसचाच विजय होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्र्यांनी दरे दौऱ्यात व्हायरल केलेल्या व्हिडिओ बाबत विचारले असता ते म्हणाले, मुख्यमंत्री सध्या गावी आले असून ते शेती करत असल्याचे चलचित्राच्या माध्यमातून दाखवत आहे. मात्र, राज्यात सध्या दुष्काळ असून, शेतकरी आत्महत्या करीत आहेत. याकडे त्यांनी लक्ष दिले, तर बरे होईल. नंतर तुम्हाला शेतीच करायची आहे, अशी कोपरखळीही त्यांनी अप्रत्यक्षपणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना यावेळी लगावली.

## रुद्र एम-२ क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी

भुवनेश्वरः भारताच्या डीआरडीओ या संस्थेने बुधवारी ओडिशाच्या किनारपट्टी भागात रुद्र एम-२ या हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली. भारतीय हवाई दलाच्या सुखोई-३० एमकेआय या लढाऊ विमानावरून घेण्यात आलेली ही चाचणी यशस्वीपणे पार पडली. सुखोई विमानावरून हे क्षेपणास्त्र डागण्यात आल्यानंतर हायपरसोनिक वेगाने काही क्षणांतच त्याने आपले लक्ष्य उद्‌ध्वस्त केले. त्यावेळी झालेल्या स्फोटात लक्ष्य पूर्णत: नष्ट करण्यात आले. रुद्र एम-२ हे हवेतून जमिनीवर डागता येऊ शकणारे क्षेपणास्त्र ६७९१.४ किमी प्रतितास वेगाने प्रवास करत आपल्या लक्ष्याला अचूक टिपते. हे एक अँन्टी रेडिएशन क्षेपणास्त्र असून रडार यंत्रणा, सॅटेलाइट, हवाई सुरक्षा कवच, रेडिओ फ्रिक्वेन्सी प्रणाली अथवा अन्य कोणत्याही यंत्रणेला थांगपत्ता लागू न देता मारा करण्यास सक्षम आहे. त्याला आता भारताचे नवे सुपर किलर क्षेपणास्त्र म्हटले जाते आहे. रशियाच्या केएच-३१ पीडी या क्षेपणास्त्राशी त्याची तुलना केली जाते आहे. रुद्र एम-२ची रचना डीआरडीओने केली असून भारत इलेक्ट्रॉनिक्स, भारत डायनॅमिक्स लिमिटेड आणि अदानी डिफेन्स अॅन्ड एअरोस्पेस यांनी एकत्रितपणे तयार केले आहे. क्षेपणास्त्राची लांबी १८ फूट असून ते १५५ किलो वजन वाहून नेऊ शकते. ध्वनीच्या पाचपट वेगाने ते मारा करू शकते. ३०० किमीपर्यंतच्या लक्ष्याला टिपण्याची त्याची क्षमता आहे. तसेच ३ ते १५ किमी उंचीपर्यंत जाऊ शकते.

# मनुस्मृती की अधोगती

काल ऑफिस लंच मध्ये
बोलता बोलता ती म्हणाली
बरे झाले बाई शालेय पाठ्यपुस्तकक्रमात
मनुस्मृती शिकवली जाणार
आपल्या पाल्यांना धर्माची शिकवण मिळणार
मुलांचं बौद्धिक विकास होणार
धर्माचे आचरण मुले लहानपणापासून करणार
ती मला सांगत होती
मी ऐकत होतो
आनंद मावत नव्हता तिच्या चेहर्यावरती
ती मला म्हणाली
तू खुश नाही का ?
तुला आनंद नाही झाला का?
शालेय पाठ्यपुस्तकात समाविष्ट केली
मनुस्मृती
मी म्हणालो
अग मला तर खूपच आनंद झाला
कारण मुलांना शाळेत मनुस्मृती शिकवली
जाणार
मुलांचा मेंदू धर्मांध होणार
आता मुले बघ बनणार धर्म जातीचे प्यादी
उद्या मोठे झाल्यावर होणार कट्टरवादी
ती म्हणाली असे का म्हणतोस तू ?
मी म्हणालो
तू कधी मनुस्मृती वाचली का ग?
ती म्हणाली नाही ?
मी म्हणालो
म्हणूनच मनुस्मृतीचा तू उदोउदो करते
तू जर मनुस्मृती वाचली असती ?
का ? जाळली मनुस्मृती
डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी तुला कळले
असते
अग मनुस्मृती शिकून मुले कट्टर होणार
सांग ना नवरा मेल्यावर तू
सती जाणार ?
की टक्कल करून आयुष्यभर सडत जगणार ?
वडिलोपार्जित अन नवऱ्याच्या
संपत्ती वरचा तुझा तू हक्क सोडणार ?
रंडीबाज,बेवडा जुगारी नवऱ्याची
तू पतीदेव म्हणून सेवा करणार ?
सांग तू शिक्षणापासून वंचित रहाणार ?
नोकरी सोडून फक्त अन फक्त
मुलं पैदा करण्याची मशीन होणार ?
तू आज उंबरठ्या बाहेर आहे
मनुस्मृती नुसार तू उंबरठ्याच्या आत
कैदी दासी गुलाम होणार ?
तुझ्या स्वातंत्र्यावर गदा येणार
तुझा उंच झोका तुटून जाणार
संविधानाने दिलेले तुला अधिकार
क्षणात नष्ट होणार
धर्म जातीचा दलाल तुझा
राजरोस मानसिक बलात्कार करणार
ती स्तब्ध होऊन सारं ऐकत होती
मी म्हणालो
मनुस्मृती नुसार तू फक्त शूद्र असणार
ह्या देशात पुन्हा जातीवाद बोकाळणार
फक एक जात श्रेष्ठ
बाकी सर्व नीच शूद्र असणार
शिवाशिव सुरू होणार
पुन्हा शूद्रांना मंदिर प्रवेश नसणार
अग तुझ्या पाळीचा जो धर्म अन ग्रंथ
धरतो विटाळ
तरी तू त्या धर्माचे गाते गुणगान
अन ग्रंथाचे कुटते टाळ
अग तू तुझा मेंदू ठेवू नको गहाण
मनुस्मृती हवी की
हवे तुला संविधान
संविधान धर्मनिरपेक्ष, समता,बंधुता,आम्ही
भारतीय शिकवते
बुद्धी तुझी जागृत कर आता तरी
मनुस्मृती सांगते
शूद्र गवार ढोर नारी
सब ताडन के अधिकारी
तुझ्या उन्नतीसाठी प्रगतीसाठी स्वातंत्र्यासाठी
नको राहू खोट्या भ्रमात
तूच ठरव आता
मनुस्मृती की संविधान हवे शालेय
पाठ्यपुस्तकक्रमात

**बुद्धराज शशिकला अर्जुनराव गवळी ( राजन)**
९१७२२ ९१४४८

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# मंद्रूपमध्ये जितेंद्र आव्हाडांच्या पुतळात जोडोमार आंदोलन

## आव्हाड यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करा आमदार सुभाष देशमुख यांची मागणी

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी काल डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची विटंबना केल्याच्या निषेधार्थ मंद्रूप येथे आमदार सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या प्रतिमेस जोडोमार आंदोलन करण्यात आले. आमदार सुभाष देशमुख यांनी जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी बुधवार महाडमध्ये मनुस्मृती दहन केले. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात मनुस्मृतीतील श्रलोक घेण्यात येणार असल्याच्या निषेधार्थ त्यांनी ही भूमिका घेतली होती. मात्र मनुस्मृती दहन करत असतानाच आव्हाड यांच्याकडून डॉ. आंबेडकरांचे छायाचित्र असलेले एक पोस्टर फाडले. हा मुद्दा धरत भाजपने त्यांच्या विरोधात राज्यभर आंदोलन केले

त्याचाच एक भाग म्हणून मंद्रूप मध्येही आमदार सुभाष देशमुख यांच्या




नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी आमदार देशमुख म्हणाले की जितेंद्र आव्हाड यांच्याकडून वारंवार बाबासाहेब आंबेडकर काल केलेले कृत्य निषेधार्य लवकरात लवकर कारवाई होणे गरजेचे आहे या कृत्यानंतर त्यांनी मागितलेली माफी म्हणजे केवळ नाटक असल्याचेही आमदार देशमुख म्हणाले. यावेळी मंद्रूप पोलीस स्टेशन येथे त्यांच्यावर तात्काळ करावी करण्यात यावी यासंदर्भात निवेदन देण्यात आले. याप्रसंगी तालुकाध्यक्ष संगप्पा केरके, डॉ चनगोंडा हविनाळे, हणमंत कुलकर्णी, अतुल गायकवाड, अंबिका पाटील,संदीप टेळे,सुनील नांगरे,शशिकांत दुपारगुडे, यतीन शहा,गौरीशंकर मेंडगुदले, विश्र्वनाथ हिरेमठ, नितीन रनखांबे,भीमाशंकर बबलेश्र्वर,अभिजित कापसे,सूरज खडाखडे,सोमनिंग कमळे व तसेच भाजपा पदाधिकारी आणि उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या जितेंद्र आव्हाडांना अटक करा

## भाजपा आणि महायुतीची मागणी : आव्हाड यांच्या प्रतिमेला जोडे मारुन केला निषेध

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा फाडून यांचा अवमान केल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड यांना तत्काळ अटक करावी आणि कठोर कारवाई करावी, अशी मागणी भाजपा आणि महायुतीतर्फे करण्यात आली.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात आंदोलन करण्यात आले.

याप्रसंगी जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या जितेंद्र आव्हाड यांचा निषेध असो, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो, जितेंद्र आव्हाडांवर कारवाई झालीच पाहिजे, आदी घोषणा याप्रसंगी देण्यात आल्या.

माजी पालकमंत्री आमदार विजयकुमार देशमुख म्हणाले, ज्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील दबलेल्या, पिचलेल्या, उपेक्षितांना न्याय, अधिकार मिळवून दिले त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा फाडण्याचे कृत्य जितेंद्र आव्हाड यांनी केले आहे. त्याबद्दल त्यांना तत्काळ अटक करून कारवाई करावी.

भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे म्हणाले, जितेंद्र आव्हाड यांनी वेळोवेळी महापुरुषांचा अपमान केला आहे.



जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर महाराज, मल्हारराव होळकर, यांच्यानंतर आता त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केला आहे. अशी वक्तव्ये करून आपण काहीतरी वेगळे आहोत हे दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. या मानसिकतेला आळा घालण्यासाठी जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी. जितेंद्र आव्हाडांनी पुन्हा असे कृत्य केले तर त्यांना राज्यात फिरू देणार नाही, असा इशाराही शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी यावेळी दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार म्हणाले, जितेंद्र आव्हाड यांच्या या कृत्याने महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. यापूर्वीही त्यांनी असे प्रकार सातत्याने केले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केल्याबद्दल जितेंद्र आव्हाड यांना अटक करून त्यांच्यावर कारवाई करावी.

याप्रसंगी माजी पालकमंत्री आमदार विजयकुमार देशमुख, भाजपाचे शहर अध्यक्ष नरेंद्र काळे, भारतीय जनता युवा मोर्चाचे शहराध्यक्ष डॉ. किरण देशमुख, भाजपा शहर उत्तर विधानसभा प्रमुख राजकुमार पाटील, माजी सभागृह नेते संजय कोळी, भाजपा सरचिटणीस विशाल गायकवाड, रोहिणी तडवळकर, रुद्रेश बोरामणी, राजू माने, मारेप्पा कंपली, जय साळुंखे, बजरंग कुलकर्णी, महेश बनसोडे, प्रवीण कांबळे, श्रीनिवास करली, श्रीनिवास पुरुड, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, आनंद चंदनशिवे, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, नगरसेवक गणेश पुजारी, हेमंत चौधरी, आनंद मुस्तारे, बसवराज बगले, प्रकाश जाधव आदी उपस्थित होते.

# पडघा येथील दोन शाळांचा १०० टक्के निकाल

## संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदन

**भिवंडी/मिलिंद जाधव**

वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील दोन शांळाचा एस.एस.सी. परिक्षेचा निकाल १०० टक्के लागल्याने संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडुन विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणासाठी अग्रेसर असलेल्या टि. ए. पाटील इंग्लिश मिडीयम स्कूलचा एस. एस. सी. परिक्षेचा १०० टक्के निकाल लागला असुन परिक्षेस बसलेले सर्वच ३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यात लावण्या श्रीधर तेलवणे हीने (९१.४०) टक्के गुण मिळवून प्रथम वैभवी गजानन मोगरे हीने (९०.६०) टक्के गुण मिळवून द्वितीय तर हर्षला संचीद्र जाधव हीने (८९.८०) टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.

शाळेने यावर्षीही १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवल्याने जिवन विद्या प्रसारक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष कुंदन पाटील उपाध्यक्ष शंशाक तांबोळी खजिनदार यशवंत गायकवाड सह सर्व संचालक मंडळाने सर्व गुणवंत व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. तर बी. बी. पाटील इंग्लिश हायस्कूल कुंरूद या शाळेचा निकाल सुध्दा १०० टक्के लागला असून परिक्षेस बसलेले सर्वच ३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यात प्रिया संतोष जाधव हीने (८३) टक्के गुण मिळवून प्रथम संकेत रघुनाथ ठाकरे ह्याने (८२.८०) टक्के गुण मिळवून द्वितीय तर विशाखा पांडुरंग पाटील हीने (८२.२०) टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. ह्या शाळेची ही ९ वी एसएससी उत्तीर्ण बॅच असुन आपली ९ वर्षाची १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवल्याने अनामिका एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष बाळाराम बांगो पाटील मुख्याध्यापिका मोनीका मराडे, अनामिका पाटील यांनी गुणवंत व सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# पुर्वीचा काळ कर्तव्याशी प्रामाणिक राहण्याचा होता : भास्कर मुंडे

## माजी विभागीय आयुक्त यांची सदिच्छा भेट

**बीड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मराठवाडा विभागाचे सेवानिवृत्त विभागीय आयुक्त भास्कर मुंडे यांनी बुधवारी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली. पत्रकार संघाच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले तर सनदी अधिकारी म्हणून ३२ वर्षपेक्षा अधिक काळ काम करताना आलेल्या अनेक अनुभव सांगताना प्रशासनात पुर्वीचा काळ कर्तव्याशी प्रामाणिक राहण्याचा होता, आज त्याची वानवा दिसते असे स्पष्ट मत व्यक्त केले.



बीड येथे खाजगी कामानिमित्त आलेले सेवानिवृत्त मराठवाडा विभागाचे महसूल विभागीय आयुक्त भास्कर मुंडे यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांचे वसंत मुंडे यांनी स्वागत केले. यावेळी पत्रकार संघाच्या माध्यमातून लोकसभा निवडणूकीत वर्तमानपत्रांच्या प्रश्र्नांकडे लक्ष वेधण्यासाठी शंभर उमेदवारांना दिलेल्या निवेदनाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. तर ३२ वर्षपेक्षा अधिक काळ प्रशासकीय सेवेत काम करताना विविध माध्यमातील पत्रकारांनी मोलाचे सहकार्य केल्याची कृतज्ञ भावना व्यक्त केली. प्रशासकीय सेवेत लोकांना मदत करताना अनेक अनुभव येतात. अलीकडे मात्र प्रशासकीय यंत्रणेत आलेल्या लोकांबद्दल सर्वसामान्य माणसात नकारात्मकता दिसून येते. याला प्रशासकीय यंत्रणेतील लोकांचे वर्तन जबाबदार असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. पुर्वीचा काळ कर्तव्याशी प्रामाणिक राहण्याचा होता, आता त्याची वनवा दिसत आहे असे मतही त्यांनी व्यक्त केले.

# करिअर पोषक राबवलेले तब्बल १४ उपक्रम निश्चितच कौतुकास्पद : योगेश कबाडे




**अक्कलकोट/प्रतिनिधी:**

मुले एकमेकांच्या संगतीने शिकतात. याचाच वापर करत विद्यार्थ्यांना मेंटॉरींग ची जबाबदारी देऊन ग्रामीण भागात सुट्टीच्या काळात मोफत करिअर पोषक राबवलेले तब्बल १४ उपक्रम निश्र्चितच कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन योगेश कबाडे यांनी केले.चप्पळगांव येथील ग्रामीण विद्या विकास विद्यालय चप्पळगांव येथे वासंतिक नवोपक्रम उपक्रम समारोप गुरूवारी सकाळी पार पडले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बसवराज माळी हे होते. त्याप्रसंगी व्यासपीठावर प्रशालेचे पर्यवेक्षक संजय माने, योगेश कबाडे, संयोजक निलकंठेश्र्वर पाटील, स्वप्नील बणजगोळ, तेजश्री गोविंदे आदीची प्रमुख उपस्थित होती.

चप्पळगांव सारख्या ग्रामीण भागात अँबेकस, वेदिक गणित, ब्युटी पार्लर, स्पोकन इंग्लिश, सुलेखन, संगणक हार्डवेअर, स्फाँटवेअर, क्राफ्ट, चित्रकला, मेहंदीदी, फेटा बांधणे, कागदकाम, कोडिंग असे चौदा उपक्रम मोफत १६ एप्रिल ते ३० मे पर्यंत दरम्यान सकाळी ८ ते साडेअकरा पर्यंत घेण्यात आले. त्याचा समारोप ३० मे ला करण्यात आला. मेटाँर झालेले ४३ विद्यार्थीनी जवळ जवळ ६०० पेक्षा जास्त विद्यार्थी विद्यार्थ्यांनीनी या काळात तयार केले. या उपक्रमास चप्पळगांव शाळेसह परिसरातील अनंत चैतन्य, दहिटणे, खेडगी, मंगरूळे, आय एम एस, पुणे, अणदुर, आदीसह विविध शाळेतील विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते. स्वागत व प्रास्तविक श्रावणी हेगडे तर परिचय भक्ती बोधले हिने केले. सुत्रसंचालन अर्पणा जाधव, कृष्णा माळी यांनी तर आभार प्रणव पाटील यांनी मानले. यावेळी मनोगत शर्वरी नारंगकर, भाग्यलक्ष्मी नारंगकर, ईशा कोरे, शंकर माळी,प्रणाली सपकाळे, ऐश्र्वर्या व्हनमाने, वैष्णवी सुरवसे, श्रेया पाटील, स्वामिनी दसले, दीक्षाभुमी गजधाने, श्रीशैल हुल्ले, अमृता दसाडे यांनी आपले अनुभव कथन केले. फेटा प्रशिक्षक स्वप्नील बणजगोळ, ब्युटिपार्लर तेजश्री गोविंदे, मेहंदी व रांगोळी मंजुश्री पाटील, सुलेखन मल्लिनाथ माणकोजी, चित्रकला, कागदकाम व क्राफ्ट हणमंतु व्यंन्यालोलु, इंग्रजी स्पोकन निलकंठेश्र्वर पाटील, वेदिक गणित सुजाता उडचाण, अँबेकस चंद्रशेखर फताटे, हाँडवेअर आणि स्फाटवेअर मुलांतील मेंटाँर व कोडिंग प्रणव पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कदम, विजापूरे, मदने, पाटील,दुलंगे, म्हेत्रे, नागनाथ सपकाळे, मिनाक्षी हेगडे, हेगडे, युवराज जाधव, देविदास राजेगांवकर, पुण्यशाली कोरे आदीसह पालक, शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

**निलकंठेश्र्वर पाटील सीईओ ग्रामीण विद्या विकास विद्यालय चप्पळगांव– शिक्षण हे समाज बदलण्याचे एकमेव साधन आहे या तत्वांनी मोबाईल तंत्रज्ञानाचा उपयोग चांगल्या साठीही करता येतो. हे विद्यार्थ्यांमध्ये हे बिंबवणे ही जिद्द बाळगुन हे उपक्रम राबविले. भविष्यात रोबोटिक्स, चेस, संगीत, गायन, स्पोर्टस समुपदेशन, क्रीडा मानपपोचार तज्ञ्ज, नियमित समुपदेशन सुरु करण्यात येणार आहे. स्लो लर्नरला आयसीटीचा माध्यमातून सक्षम केले जाणार आहे.**

**रविकांत पाटील अध्यक्ष श्री मल्लिकार्जुन शिक्षण प्रसारक मंडळ चप्पळगांव– ग्रामीण भागात असुनही प्रशाला विद्यार्थ्यांच्या हितासाठी वेगवेगळे उपक्रम राबवित असते. दिवाळी व उन्हाळी या दोन्ही सुट्टीसह नियमितही अनेक उपक्रम राबविले जातात.**

**कार्यक्रमाचे अध्यक्ष बसवराज माळी– ज्ञानासोबत नितिमत्ता ही महत्त्वाचा आहे. नितीमत्ता आपणाला माणुस म्हणुन कसे जगायचे याला दिशा देते.**

**गीता वाले फेटा बांधणे मेंटॉर– फेटा बांधायला शिकले. इतर सर्वांना शिकविले.शिकवताना आनंद वाटला.**

**प्रशालेला बेस्ट टीम अँवार्ड – पी.ए.इनामदार यांचे आझम कँम्पस पुणे येथे ४० विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी गेले होते. हाँर्डवेअर प्रक्षिणक दिले होते. ३० संगणक संच शाळेला भेट दिले. रोबोटिक्स स्पर्धेत बेस्ट टीम अँवार्ड मिळाले आहे.**

# तोळणूर श्री.सिद्धरामेश्र्वर प्रशालेच्या अमोल पाटील बोरोटी केंद्रातून प्रथम; प्रशालेच्या दहावीचा निकाल ९८ %

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे विभागाच्या वतीने मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र दहावी परीक्षेत तोळणूर येथील श्री फत्तेसिंह शिक्षण संस्था अक्कलकोट संचलित श्री सिद्धरामेश्र्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला तोळणूरचे विद्यार्थी अमोल राजशेखर पाटील ९५% गुण प्राप्त करून बोरोटी केंद्रात आणि शाळेत प्रथम क्रमांक येण्याच्या मान मिळविला असून प्रशालेत द्वितीय क्रमांक संगणप्पा धानप्पा उपासे ८६.४० % तर अश्र्विनी रमेश व्हरकेरी ८६ % गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकाविला आहे .



अमोल रा.पाटील (95%) प्रथम



संगणप्पा धा.उपासे (86.40%) द्वितीय



अश्विनी र. व्हरकेरी (86%)तृतीय



पल्लवी ब. सिन्नुर (85.60) द्वितीय कन्नड



संजना सु. कुरले (84.80)तृतीय कन्नड



काशीबाई अ. कुसगल (78.60) तृतीय मराठी

परीक्षेसाठी एकूण ५० विद्यार्थी बसले होते .शाळेच्या एकूण निकाल ९८ % इतका लागला आहे . प्रशालेने मागील यशाची परंपरा कायम राखले असून प्रशालेचा विद्यार्थी पाटील अमोल राजशेखर ९५% टक्के गुण प्राप्त करून बोरोटी केंद्रातून प्रथम येण्याचा मान पटकावला तसेच कुमारी –पल्लवी बसवराज सिन्नुर हिने ८५.६०% टक्के गुण बोरोटी केंद्रातून आणि प्रशालेत कन्नड माध्यमातुन द्वितीय क्रमांक आणि कुमारी–संजना सुरेश कुरले हिने ८४.८०% घेऊन बोरोटी केंद्रातून आणि प्रशालेत कन्नड माध्यमातुन तृतीय क्रमांक येण्याचा मान प्राप्त केली आहे.प्रशालेतून मराठी माध्यमातून संगणप्पा धानप्पा उपासे ८६.४० % (प्रथम क्रमांक) अश्र्विनी रमेश व्हरकेरी ८६ %(द्वितीय क्रमांक)कुमारी – काशीबाई अनिल कुसगल ७८.६०% घेऊन प्रशालेत (तृतीय क्रमांक) प्राप्त केले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक प्रकाश अतनुरे,काशिनाथ चलगेरी,हमीद नदाफ मुख्याध्यापक सुशीलकुमार गायकवाड,नसिरपाशा पिरजादे, जगदेवी माणकोजी,विठ्ठल पवार,कांचन पवार इतर सर्व सहशिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले आहे मार्गदर्शक शिक्षक आणि यशस्वी विद्यार्थ्यांच्या संस्थेचे अध्यक्ष राजीव माने संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जाधव संस्थेचे उपाध्यक्ष प्रल्हाद जाधव, तानाजी चव्हाण, बाळासाहेब मोरे , सुधाकर गोड्याल, अमर शिंदे, शालेय समिती चेअरमन विक्रांत गोडसे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश व्हरकेरी, उपाध्यक्ष शामराव पाटील यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिले आहे .

# सोलापूर जिल्ह्यात १६५ शाळात सेमी इंग्रजी वर्ग सुरू करणार

## मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे



**सोलापूर/प्रतिनिधी:**

जिल्हा परिषदेच्या जिल्ह्यातील १६५ शाळांमध्ये यंदाच्या वर्षापासून सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यात येणार आहेत त्यामुळे इयत्ता पहिलीमधील ३३७८ विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीची बैठक नुकतीच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.यावेळी शिक्षण विभागातील विविध योजनांचा आढावा घेण्यात आला.जिल्ह्यात १७५ शाळांनी सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्याची मागणी प्राथमिक शिक्षण विभागाकडे केली होती.त्यानुसार यावेळी जिल्ह्यातील १६५ शाळांमध्ये सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला तसेच त्यासाठी विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेकडून पुस्तके व शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचेही ठरले. गुढीपाडवा पट वाढवा या उपक्रमांतर्गत शाळांची पटसंख्या १० टक्क्यांनी वाढविण्याचे उद्दिष्ट होते. सद्यस्थितीमध्ये इयत्ता पहिलीचे ७० नोंदणी झालेली आहे.उर्वरित पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याची सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी आव्हाळे यांनी केली. जिल्हा परिषद अंतर्गत जिल्ह्यात माढा येथे एकमेव माध्यमिक शाळा आहे.या शाळेतील वर्ग खोल्या व भौतिक सुविधांची दुरुस्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला.शेळगी येथील सावित्रीबाई फुले मुलीचे वसतिगृहामधील विद्यार्थीनीसाठी भौतिक सुविधा व सुधारणा करण्याबाबत सुचना करण्यात आली.शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ मध्ये शाळा पूर्व तयारी शाळेस सर्व सुविधा व स्वच्छतेबाबत खात्री करण्यासाठी पर्यवेक्षीय यंत्रणेनी शाळा सुरू होण्यापूर्वी भेटी देऊन अहवाल सादर करण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत.

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत सर्व शाळांमध्ये परसबाग तयार करणे याबाबत सूचना देण्यात आल्या तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या संकल्पनेतील अमृतरसोई योजना जास्तीत जास्त शाळांमध्ये अंमलबजावणी करणे , आदी निर्णयही घेण्यात आले.यावेळी शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) कादर शेख , शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) सचिन जगताप , शिक्षणाधिकारी ( योजना ) सुलभा वठारे , उपशिक्षणाधिकारी संजय जावीर यांच्यासह सर्व गट शिक्षणाधिकारी , विस्तार अधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्याच्या वातावरणास पोषक रेशीम शेती व डाळिंब लागवडीवर भर द्या : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**सोलापूर/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील हवामान आणि पर्जन्यमानाची परिस्थिती बघता भविष्यामध्ये पाण्याचे प्रश्न निर्माण होऊ शकतात यामुळे जिल्ह्याच्या हवामान आणि पर्जन्यमानास पोषक अशा रेशीम उत्पादन आणि डाळिंब लागवड यासारख्या पीक पद्धतीवर भर द्या अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.




कृषि विभागाकडून पिकावरील किडरोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प अंतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळेचे हुतात्मा स्मृती मंदीर, पार्क चौक, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विभागीय कृषी सहसंचालक रफिक नायकवडी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री दत्तात्रय गावसाणे, आत्मा प्रकल्प संचालक श्रीमती शितल चव्हाण, विभागीय कृषि संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.डी.व्ही.इंडी, कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ.लालासाहेब तांबडे, विभागीय पोस्ट कार्यालयाचे के. नरेंद्र बाबू ,राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ सोमनाथ पोखरे तसेच कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, डाळिंब ही सोलापूर जिल्ह्याची मुख्य ओळख आहे. डाळिंब हे पिक कमी कालावधीत अधिक उत्पन्न देणारे आहे.

जिल्ह्यात यासाठी पोषक वातावरण आहे. जिल्ह्यातील शेतकर्यांनी चांगल्या प्रतीच्या डाळिंबाचे उत्पादन घेत गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत तसेच रेशीम शेतीसाठीही पोषक वातावरण असल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये रेशीम उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी यावेळी केले. या कार्यशाळेमध्ये खरीप हंगामाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या विषयावर प्रमुख तज्ञामार्फत मार्गदर्शन करण्यात आले तसेच ऊस पिकांमधील हुमणी किडीचे नियंत्रण, उसाचे पाचट व्यवस्थापन,खरीप कांदा उत्पादन तंत्रज्ञान, सी आर ए पद्धतीने फळबाग लागवड, सुपर केन पद्धतीने ऊस रोपवाटिका स्थापन करणे, बीबीएफ पद्धतीने सोयाबीन लागवड, बियाणे उगवण क्षमता तपासणी, बीज प्रक्रिया, खरिपातील प्रमुख पिके तूर उडीद सोयाबीन यांचे उत्पादन तंत्रज्ञान, सोयाबीन पिकांमधील गोगलगायींचे नियंत्रण, जिल्ह्यामध्ये रेशीम उत्पादनाची मोहीम इत्यादी विषयावर सखोल असे मार्गदर्शन करण्यात आले

# संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेचे अनुदान डीबीटी मार्फत वाटप

**सोलापूर/प्रतिनिधी:**

शासनाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना दरमहा १५००/- रुपये अनुदान दिले जाते. हे -नदान लाभार्थ्यांना तहसिलस्तरावरून बँकेत पाठवून संबंधितांच्या खात्यावर वर्ग केली जाते. मात्र आता थेट डीबीटी मार्फत पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदान वितरीत केले जाणार आहे.

संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेच्या लाभासाठी यापूर्वी तहसिल कडून संबंधित बँकेत सर्व लाभार्थ्यांची यादी पाठवून त्यानूसार निधी दिला जात आहे, तो निधी बँकेकडून संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग केला जात आहे. परंतु आता संगायो व श्रावणबाळ लाभार्थ्यांचे अनुदान बँकेच्या खात्यावर थेट डीबीटी मार्फत मिळणार आहे. त्यासाठी संगायो निराधार योजना व श्रावणबाळ योजनेचा लाभ घेत असलेल्या पात्र लाभार्थ्यांकडून आधारकार्ड आणि मोबाईल क्रमांक संकलित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याबाबत गावस्तरावर तलाठयांना आवश्यक सुचना देण्यात आल्या आहेत.

**आवश्यक कागदपत्रे : हयात प्रमाणपत्र ,आधारकार्ड छायांकित प्रत बँकेचे पासबूक छायांकित प्रत , मोबाईल नंबर ( मोबाईल नंबर व आधारकार्ड त्या बँकेच्या खात्याला लिंक केला असेल त्या बँक खात्यात सदर अनुदान जमा होणार आहे. ) शिधापत्रिका छायांकित प्रत . दिव्यांग प्रमाणपत्र इ.**

संगायो व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांनी हयात प्रमाणपत्र , बँक पासबुक ,आधार कार्ड मोबाईल क्रमांक इ. आवश्यक कागदपत्रे संबंधित तहसिल कार्यालयाच्या संजय गांधी शाखेत अथवा संबंधित गावचे तलाठी यांचे कडे १५ जून २०२४ पर्यंत जमा करावेत. जे लाभार्थी आवश्यक कागदपत्रे जमा करणार नाहीत ते लाभार्थी अनुदानापासून वंचित राहतील याची नोंद घ्यावी. विशेष सहाय्य योजनेचे लाभर्थी हे अनुदानापासून हे वंचित राहू नये यासाठी लाभार्थ्यांनी आपली कागदपत्रे संबंधित तहसिल कार्यालयाचे संजय गांधी शाखा अथवा गाव तलाठी यांचे कडे जमा करावीत, असे आवाहन जिल्हा प्रशासन यांचे कडून करण्यात येत आहे.

# अक्कलकोट तहसीलदार यांना बोरोटी ते आंदेवाडी(ज ).रस्ता संदर्भात निवेदन

**अक्कलकोट/निंगप्पा निंबाळ**

अक्कलकोट तालुक्यातील मौजे बोरोटी बु.ते आंबेवाडी(ज).हा चार किलोमीटरचा रहदारी रस्ता असून,त्या रस्त्यामध्ये व त्या रस्त्याच्या आजूबाजूला काटेरी झाडाजुडपाने वेडा घातलेला आहे. त्या झाडाझुडपामुळे रस्त्यावर येणाऱ्या वाहनांना मोटरसायकल वाल्यांना, शेतकऱ्यांना व चालत पायी जाणाऱ्या या सर्व लोकांना नाहक बळी त्रास सहन करावा लागत आहे, कारण रस्ता हा छोटा असून रस्त्याच्या कडेला व दोन्ही बाजूला काटेरी झाडे झुडपे मोठ्या प्रमाणात वाढले आहे त्यामुळे एक जर गाडी आली व समोरून जर गाडी आली त्या दोघांना एकाच ठिकाणी तासनतास ताटकळत थांबावं लागते, कारण मागेपुढे घेण्यासाठी किंवा बाजूला घेण्यासाठी अजिबात रस्ता नाही




म्हणून अक्कलकोट तालुक्याचे तहसीलदार मा. विनायक मगर साहेब यांना मानव सेवा फाउंडेशन च्या वतीने ताबडतोब रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी अन्यथा आंदोलन करण्यात येईल,असा इशारा देण्यात आलेला आहे. त्यावेळी संघटनेचे अध्यक्ष दत्ता कांबळे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, आंदेवाडी सरपंच रमेश धोडमनी,कॉन्ट्रॅक्टर कांत भाऊ कांबळे, चंदप्पा गायकवाड, दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी, हनुमंत कांबळे, शंकर कांबळे पप्पू कांबळे व आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# तुळजापूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान करणाऱ्या आमदार जितेंद्र आव्हाड यांचा रिपाइं (आठवले) तर्फे निषेध

वागदरी/एस.के.गायकवाड : शालेय पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेल्या मनुस्मृती श्र्लोक पाठ्यपुस्तकातून वगळण्यात यावे या मागणीसाठी महाड येथील क्रांती भूमिवर मनुस्मृती चे प्रतिकात्मक दहन आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) चे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडून त्यांचा अवमान केला.सदर घटना ही निषेधार्थ असून आमदार जितेंद्र आव्हाड यांचा तुळजापूर येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला.



या संदर्भात रिपाइं (आठवले) च्या वतीने तुळजापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक याना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृती शिकवण्याच्या शासन निर्णयाच्या विरोधात जितेंद्र आव्हाड यांनी महाड येथे मनुस्मृतीचे प्रतिकात्मक दहन करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो फाडून अवमान केला आहे.सदर घटना ही निषेधार्थ असून आमदार जितेंद्र आव्हाड यांचा रिपाइं (आठवले)तुळजापूरच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत आहे.आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर ट्रॉसिटी ऍक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच जितेंद्र आव्हाड यांनी आंबेडकरवादी जनतेची जाहीर माफी मागावी अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) तुळजापूरच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल इशारा देण्यात येत आहे.

तुळजापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक यांना देण्यात आलेल्या निवेदनावर

रिपाइं (आठवले) चे जिल्हा सरचिटणीस तानाजी कदम, विधानसभा अध्यक्ष प्रकाश कदम, शहराध्यक्ष अरुण कदम, युवा शहराध्यक्ष अमोल कदम, कामगार आघाडी अध्यक्ष आप्पा कदम, तालुका युवा अध्यक्ष विष्णू सोनवणे,दाजी माने भिमराव सोनवने सह कार्यकर्ते यांच्या सह्या आहेत.



# रिपाइंच्या वतीने अक्कलकोट येथे जितेंद्र आव्हाड याच्या पुतळ्याला जोडे मारुन पुतळा दहन करुन केला निषेध

अक्कलकोट/प्रतिनिधि : भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची विटंबना जितेंद्र आव्हाड यांनी केल्याबद्दल जोडे मारो व पुतळा दहन आंदोलन अक्कलकोट येथे रिपाइं आठवले यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी जितेंद्र आव्हाड यांचे मिश्या कापणाऱ्याला ६ हजर ६६६ रुपये बक्षीस देण्यात येणार असल्याचे घोषणा रिपब्लिकन पक्षाच्यावतीने करण्यात आले

रिपाइं आठवले पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा.ना रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली,महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या आदेशांने ही आंदोलन ठेवण्यात आली होती.

सदर आंदोलन तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे व शहर अध्यक्ष अजय मुकणार यांच्या नेृत्वाखाली करण्यात आली आहे.याप्रसंगी रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,युवक आघाडी जिल्हा सरचिटणीस विजयकुमार पोतेनवरु,राहुल रुही,ता सचिव राजु भगळे,ता उपाध्यक्ष चंद्रकांत गायकवाड,शहर सचिव शुभम मडिखांबे,यु आ ता उपाध्यक्ष कृष्णा धोडमनी,उत्तम गायकवाड,दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी,विलास गायकवाड,सुर्यकांत सोनकांबळे,आंदेवाडीचे सरपंच रमेश धोडमनी,रोमीत मडिखांबे,उमेश शिवशरण,राजशेखर गायकवाड,भीमा मडिखांबे,अनील नाटेकर,लहू गायकवाड,अंबादास बनसोडे,अंबादास शिंगे,अजय मडिखांबे,शिवानंद मडिखांबे, सुरेश गायकवाड,रवी सलगरे, राजकुमार गवळी, विलास गायकवाड आदी तालुका व शहर चे पदाधिकारी व सर्व आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी एवन चौक अक्कलकोट येथील हुतात्मा स्तंभ येथे उपस्थित होती.



# सुंदरपुर येथे खरीप पूर्व हंगाम तयारी मार्गदर्शन

**निफाड/प्रतिनिधी**

निफाड तालुक्यातील सुंदर पुरेसे कृषी विभागाच्या वतीने खरीप पूर्व हंगाम तयारी कशी करावी याविषयी शेतकरी वर्गाला मार्गदर्शन करण्यात आले.सुंदरपुर येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन कृषी विभागाच्या वतीने खरी पूर्व हंगाम तयारी करताना सोयाबीन बियाणे उगवण क्षमता तपासणी बीज प्रक्रिया, ऊस पिकातील हुमणी अळी व्यवस्थापन, महाडीबीटी वरील अर्ज ऑनलाईन करणे, एस आर टी तंत्रज्ञानाविषयी माहिती, एम आर जी एस फळबाग लागवड ,आदी विषयांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

याप्रसंगी मंडल कृषी अधिकारी जे. आर .क्षीरसागर, कृषी पर्यवेक्षक टी.बी खेमनर ,कृषी सहाय्यक वाय. बी पाटील, तसेच सुंदरपुर ग्रामपंचायत सरपंच विजय सोमवंशी, उपसरपंच गुलाब पवार, शिवाजी सोमवंशी, राजेंद्र सोनवणे, धर्मराज सोमवंशी, भाऊसाहेब सोमवंशी, विनोद सोमवंशी, राजेंद्र सोमवंशी, आदी ग्रामस्थ उपस्थित होते,